Kotak Mahindra Bank

July 23, 2023

| BSE Limited<br>Corporate Relationship Department<br>Phiroze Jeejeebhoy Towers,<br>Dalal Street,<br>Mumbai 400 001<br>**BSE Scrip Code: 500247, 715026, 958687, 974396, 974682, 974924** | **National Stock Exchange of India Limited**<br>Exchange Plaza, Plot No. C/1, G Block,<br>Bandra-Kurla Complex,<br>Bandra (East),<br>Mumbai 400 051<br>**NSE Symbol: KOTAKBANK, KMBL, KMB26, KMB29, KMB30** |
|---|---|

Dear Sirs,

**Sub: Newspaper Clippings - Extracts of the Consolidated and Standalone Unaudited Financial Results of the Bank for the quarter ended June 30, 2023**

Pursuant to Regulation 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we enclose herewith a copy of the extracts of the Consolidated and Standalone Unaudited Financial Results of the Bank, for the quarter ended June 30, 2023, considered and approved by the Board of Directors of the Bank at their meeting held on July 22, 2023, published in Financial Express (an English daily) and Navashakti (a Marathi daily) on July 23, 2023.

The above information is also being hosted on the Bank's website https://www.kotak.com/en/investor-relations/governance/sebi-listing-disclosures.html in terms of the Listing Regulations.

This is for your information and appropriate dissemination.

Thanking you,

Yours faithfully,
**For Kotak Mahindra Bank Limited**

Avan Kayomars Doomasia

Digitally signed by Avan Kayomars Doomasia
DN: c=IN, o=Personal, 2.5.4.20=936426ab16daed316d10ea56e243b60da38d6a8e4e7cee104eba3dabb85f7eb0, postalCode=400019, st=Maharashtra, serialNumber=c5b4f62f0f274f8ba3c25c2d4a7f47f4d9711b02abf04d9bef1049b3fad70555, cn=Avan Kayomars Doomasia
Date: 2023.07.23 15:20:15 +05'30'

**Avan Doomasia**
**Company Secretary**

Encl.: as above

# KOTAK MAHINDRA BANK LIMITED

CIN - L65110MH1985PLC038137
**Registered Office:** 27BKC, C 27, G Block, Bandra Kurla Complex, Bandra (East) - 400 051
**Tel.:** +91-22-61660001 **Fax:** +91 22 6713 2403
**Website:** www.kotak.com **E-mail:** KotakBank.Secretarial@kotak.com

## FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30TH JUNE, 2023

₹ in crore

| Particulars | STANDALONE | | | CONSOLIDATED | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Quarter ended 30th June, 2023 (Unaudited) | Year ended 31st March, 2023 (Audited) | Quarter ended 30th June, 2022 (Unaudited) | Quarter ended 30th June, 2023 (Unaudited) | Year ended 31st March, 2023 (Audited) | Quarter ended 30th June, 2022 (Unaudited) |
| Total income from operations (net) | 13,183.26 | 41,333.90 | 8,454.52 | 20,723.91 | 68,142.03 | 11,569.09 |
| Net Profit / (Loss) before tax (before extraordinary items) | 4,585.26 | 14,390.99 | 2,759.67 | 5,586.43 | 19,646.18 | 3,685.90 |
| Net Profit / (Loss) before tax (after extraordinary items) | 4,585.26 | 14,390.99 | 2,759.67 | 5,586.43 | 19,646.18 | 3,685.90 |
| Net Profit / (Loss) after tax (before extraordinary items) | 3,452.30 | 10,939.30 | 2,071.15 | 4,150.19 | 14,925.01 | 2,755.39 |
| Net Profit / (Loss) after tax (after extraordinary items) | 3,452.30 | 10,939.30 | 2,071.15 | 4,150.19 | 14,925.01 | 2,755.39 |
| Paid up Equity Share Capital | 993.61 | 993.28 | 992.72 | 993.61 | 993.28 | 992.72 |
| Reserves (excluding Revaluation Reserves and Minority Interest) | 81,966.67** | 81,966.67** | 70,964.14* | 110,760.81** | 110,760.81** | 95,641.70* |
| Basic Earnings per equity share (before extraordinary items) (of ₹ 5/- each) (not annualised except for year ended 31st March, 2023) | 17.38 | 54.89 | 10.43 | 20.89 | 74.96 | 13.88 |
| Diluted Earnings per equity share (before extraordinary items) (of ₹ 5/- each) (not annualised) | 17.38 | 54.87 | 10.43 | 20.89 | 74.94 | 13.88 |
| Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/ (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | – | – | – | | | |
| Securities Premium Account | 25,083.24 | 24,983.93 | 24,807.92 | | | |
| Net worth (Refer note 3) | 86,434.93 | 82,794.81 | 74,058.50 | | | |
| Outstanding debt | 20,378.16 | 23,416.27 | 15,389.90 | | | |
| Outstanding redeemable preference shares | NA | NA | NA | | | |
| Debt Equity Ratio (Refer Note 3) | 0.23 | 0.28 | 0.21 | | | |

* As on 31st March 2022

** As on 31st March 2023

Notes:

1. The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulations 33 and 52 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of aforesaid Quarterly Financial Results are available on the websites of Stock Exchanges at **www.bseindia.com** and **www.nseindia.com** and also on website of the Bank **https://www.kotak.com/en/investor-relations/financial-results.html?source=website.**
2. As Ind AS is not applicable to Banking companies, total Comprehensive Income and other comprehensive income is not applicable.
3. Information as required pursuant to Regulation 52(4) of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015:
   Methodology for computation of the rations is, as follows

| | |
|---|---|
| Debt-Equity ratio | Represents the ratio of Borrowings / Sum of Capital and Reserves and Surplus |
| Networth | Calculated as per the Master Circular - Exposure Norms issued by the RBI. |

4. Capital Redemption Reserve and Debenture Redemption Reserve is not applicable to the Bank.
5. There has been no change to significant accounting policies during the quarter ended 30th June, 2023 as compared to those followed for the year ended 31st March, 2023.

By Order of the Board of Directors
**For Kotak Mahindra Bank Limited**

**Dipak Gupta**
Joint Managing Director

Mumbai, 22nd July, 2023

निवडक महाराष्ट्र

## रेल्वेची संपत्ती चोरणारा पोलिसांच्या जाळ्यात

**नांदेड :** वजिराबाद गुन्हे शोध पथकाने रेल्वे विभागाची संपत्ती चोरणाऱ्या चोरट्याला दि. १९ रोजी अटक केली आहे. गुन्हे शोध पथकाचे सह पोलीस निरीक्षक शिवराज जमदडे, पोलीस नाईक विजयकुमार नंदे, शरदचंद्र चावरे, मनोज परदेशी आदी १९ जुलै रोजी ठाणे हद्दीमध्ये पेट्रोलींग करीत होते. दरम्यान, पक्की चाळ चौकामध्ये एक जण लहान आकाराचे सहा पोते घेऊन उभा मिळुन आला. पोत्यांची पाहणी केली असता त्यामध्ये रेल्वेच्या ब्रेक लायनरर्सच्या स्पीड पीन आढळून आल्या. सदरचे पोते लालवाडी जवळील रेल्वे वर्कशॉपमधील कुलूप तोडून चोरी आले असून किशन राम शिंदे (वय ३८, रा. रामलीला मैदान, हिंगोली) असे नाव असल्याचे सांगितले. एकूण ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## चाकूच्या धाकाने भिकाऱ्याचे पैसे लंपास

**नांदेड :** चाकूचा धाक दाखवून भीक मागून जमा केलेले पैसे चोरट्याने पळविल्याची घटना बिलोली तालुक्यतील कुंडलवाडी येथे घडली आहे. यासंबंधी हिंगोली जिल्ह्यातील तेलगाव येथील रहिवासी मंगलाबाई संतोष गिरी यांनी पोलीसात तक्रार दिली. मंगलाबाई यांचे पती २० जुलै रोजी सकाळी आठ ते सायंकाळी चार दरम्यान, कुंडलवाडी येथील समाधान हॉटेलच्या आडोशाला झोपले होते. यातील अज्ञात आरोपीने चाकूचा व बियरच्या बॉटलीचा धाक दाखवून मंगलाबाई यांच्या हातातील भीक मागून जमा कलेले ५०० रुपयांची एक नोट,१०० रुपयांच्या चार नोटा, असे एकूण ९०० रुपये जबरदस्तीने घेऊन गेले.

# अतिवृष्टीमुळे शेतीसह जनजीवन विस्कळीत



**प्रतिनिधी/नांदेड :** किनवट तालुक्यात २० ते २२ जुलै रोजी सर्व ९ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील एकूण १७६ गावांतील २१ हजार ४१५ शेतकऱ्यांचे १३ हजार २४६ हेक्टर आर. वरील शेतीपिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. अतिवृष्टीमुळे कोणतीही जीवितहानी झाली नसून २ पशुधन दगावले आहे.

पिंपरी येथे डोंगराचे माळरान खचून जवळपास ६५ घरांची पडझड झाली आहे. तसेच भंडरवाडी येथील १२ घरांचे व इतर गावातील २५ असे ९० घरांची पडझड झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. अतिवृष्टीमुळे पेनगंगा नदीची पाणी पातळी वाढल्यामुळे सहस्त्रकुंड धबधबा दुथडी भरून वाहत आहे. सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने हा धबधबा नागरीकांसाठी तसेच पर्यटकांसाठी पुढील आदेशापर्यंत बंद केला आहे.

किनवट तालुक्यातील सिंगारवाडी, भंडारवाडी, सुंगागुडा बोधडी, बेल्लोरी कि., झेंडीगुडा, नागझरी, मलकापूर, खेर्डा या गावाचा किनवट शहरापासून संपर्क तुटला आहे. किनवट तालुक्यातील बेंदी गाव व चिखली खुर्द येथील पुलावरून पाणी वाहत असल्याने किनवट-भोकर- नांदेड हा मार्ग बंद आहे. किनवट शहरातील मोमीनपुरा भागातील जवळपास १०० ते ११० अतिवृष्टीने बाधित नागरिकांचे तात्पुरते स्थलांतर जवाहर उलूम उर्दू शाळेत करण्यात आले. येथे नगरपरिषद किनवटतर्फे त्यांच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

### नांदेड जिल्ह्यात चार दिवसांसाठी यलो अलर्ट

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. २३ ते २६ जुलै या चार दिवसासाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे. या चार दिवसांत जिल्ह्यात एक किंवा दोन ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. नागरिकांनी सुरक्षितता बाळगावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## राजश्री पाटील यांनी केली पूरग्रस्त भागाची पाहणी

### पाण्याखाली गेलेल्या १४ घरांतील कुटुंबीयांचे तात्पुरते पुनर्वसन

**नांदेड :** गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नांदेड जिल्ह्यातील हदगाव-हिमायतनगर तालुक्याला पुराच्या पाण्याचा फटका बसला आहे. शेकडो घरात पाणी शिरले असून महामार्गही पाण्याखाली गेला आहे. पैनगंगा, कयाधू नद्यांना पूर आल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. नदीकाठच्या गावांना धोक्याचा इशारा देण्यात आला आहे. सध्या पावसाळी अधिवेशन सुरू असल्याने हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार हेमंत पाटील दिल्लीत असून, त्यांच्या सूचनेनुसार राजश्री हेमंत पाटील यांनी शनिवारी (दि.२२) हदगावचे तहसीलदार विनोद गुंडमवार यांच्यासह नेवरी येथील पूरग्रस्तांना भेटून संवाद साधत त्यांना धीर दिला.

गुरुवार (दि.२०) रोजी झालेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे अनेकांना याचा फटका बसला आहे, नागरिकांनी घरात जमवून ठेवलेल्या गहू, तांदूळ, डाळ यांसह खाद्य वस्तू पाण्याखाली गेल्याने कुटुंबातील लोकांची खूप मोठी हानी झाली आहे. शेतकऱ्यांचे धन असलेले गाई, म्हशी, बैल आणि शेळ्या पुरात अडकून पडल्या आहेत. हदगाव तालुक्यातील नेवरी, मार्लेगाव, पिंपरखेड या परिसरातील भागांची राजश्री हेमंत पाटील यांनी पाहणी करून पूरस्थितीचा आढावा घेतला आणि खासदार हेमंत पाटील यांच्याशी भ्रमणध्वनीवरून व्हिडीओ कालच्या माध्यमातून पूरग्रस्त गावकऱ्यांशी संवाद घडवून आणला. यावेळी खासदार हेमंत पाटील यांनी शासन पूर्णपणे आपल्यासोबत असल्याचा विश्वास गावकऱ्यांना दिला. तेथील १४ घरे पाण्याखाली गेल्याने त्या कुटुंबीयांची शासनाच्या वतीने तात्पुरती राहण्याची व जेवणाची सोय करण्यात आली. त्या ठिकाणी जाऊन राजश्री हेमंत पाटील यांनी तेथील सुविधांची पाहणी केली.

खासदार हेमंत पाटील यांनी नांदेड, हिंगोली आणि यवतमाळच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून भ्रणनध्वनीवरून परिस्थितीचा आढावा घेतला असून, योग्य ते मदतकार्य पोहचविण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच तहसीलदार विनोद गुंडमवार यांच्याकडून हदगाव तालुक्याचा पूरस्थितीचा आढावा घेऊन त्यांना तात्काळ मदत व नुकसानभरपाईचे पंचनामे करण्याच्या सूचना खासदार हेमंत पाटील यांनी केल्याची माहितीही राजश्री हेमंत पाटील यांनी माध्यमांना दिली.

## देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त २५ हजार वह्यांचे वाटप

### भाजप नेते डॉ. अतुल भोसलेंचा पुढाकार; आरोग्य शिबिरांचेही आयोजन

**कराड :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघात सेवा कार्य दिन म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्त भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. अतुल भोसले यांच्या पुढाकाराने भाजपा कराड दक्षिणच्यावतीने शालेय विद्यार्थ्यांना सुमारे २५ हजार वह्यांचे वाटप करण्यात आले.

रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडी येथे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच कार्यकर्त्यांनी हा दिवस सेवा कार्य दिन म्हणून साजरा करून लोकोपयोगी उपक्रम राबवावेत, असे आवाहन भाजपाच्यावतीने करण्यात आले होते. त्यानुसार भाजपा कराड दक्षिणच्यावतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी वह्यावाटप उपक्रम राबविण्यात आला. कराड नगरपरिदेच्या शाळा क्रमांक ३ मध्ये भाजपा पदाधिकाऱ्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वितरण करण्यात आले.यावेळी कराड नगरपरिदेच्या शाळा क्रमांक २ सह ११,३ व शाळा क्र. ४ मधील विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात वह्यावाटप करण्यात आले.

याप्रसंगी भाजपचे कराड तालुकाध्यक्ष पै. धनंजय पाटील, शहराध्यक्ष एकनाथ बागडी, माजी नगरसेवक सुहास जगताप, रमेश मोहिते, प्रशांत कुलकर्णी,विष्णू फुटाणे, स्वाती पिसाळ, मंजिरी कुलकर्णी,उमेश शिंदे, अभिषेक भोसले, विशाल कुलकर्णी, शैलेंद्र बोंडकर, विनायक घेवदे, उपमुख्याध्यापिका जयश्री जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त कराड दक्षिण मतदारसंघात आरोग्य शिबिरांचेही आयोजन करण्यात आले आहे.

## खा. राजेंद्र गावित यांची वसई पालिकेत आढावा बैठक

**वसई :** जोरदार पाऊस पडत असताना मुंबई-अहमदाबाद महामार्गावर साचणाऱ्या पाण्याचा निचरा होत नाही. त्यामुळे या सहा पदरी मार्गावर हजारो वाहने मंद गतीने जात असून त्याचा फटका हजारो वाहनांना व स्थानिक नागरीक व प्रवाशांना होत आहे.

या बाबत महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना शुक्रवारी वसई-विरार पालिका सभागृहात खा.राजेंद्र गावित यांनी घेतलेल्या आढावा बैठकीत उपस्थित त्या अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. तर वसई-विरार महापालिकेच्या ज्या ज्या प्रभागात बेकायदा बांधकामे वाढत आहेत तेथील पालिका अधिकाऱ्यांवर पोलिसात गुन्हे दाखल करावेत, अशी देखील मागणी त्यांनी केली.

या बैठकीला राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांसोबतच पोलिस अधिकारी, विद्युत मंडळाचे अधिकारी, रेल्वे बोर्डाचे डीएफसीसी चे अधिकारी व वसई-विरार महानगरपालिका आयुक्त अनिलकुमार पवार व त्यांचे सहकारी अधिकारी उपस्थित होते. खासदारांसोबत वसई-विरार महानगरातील विविध राजकीय पक्षांचे नेते व कार्यकर्ते मंडळी उपस्थित होती. यावेळी खा. राजेंद्र गावित यांनी केलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

## चिमुरडीवर बलात्कार करून खून : एकास फाशी

**कराड :** आठ वर्षांच्या चिमुरडीवर पाशवी बलात्कार करून तिघांचा निर्घृण खून केल्याप्रकरणी रुवले ता. पाटण येथील संतोष चंद्रु थोरात (४१) याला येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाच्या विशेष न्यायाधीश के. एस. होरे यांनी मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली.

पाटण तालुक्यातील रुवले येथे २९ डिसेंबर २०२१ रोजी पीडित मुलगी व तिची मैत्रीण आरोपीच्या घरासमोर खेळत होत्या. त्यावेळी तिची मैत्रीण घरी गेली व पीडित मुलगी एकटीच खेळत असताना आरोपीने चॉकलेटचे आमिष दाखवून तिला निर्जनस्थळी नेले. त्याठिकाणी तिच्यावर पाशवी बलात्कार केला व तिचा गळा आवळून खून केला. त्यानंतर मुलीचा मृतदेह नजीकच्या ओघळीतील झाडीझुडपातील सुमारे ३० फूट खोल दरीत फेकून दिला. पीडित मुलगी उशिरापर्यंत घरी न आल्याने घरातल्यांनी ढेबेवाडी पोलीस ठाण्यात मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार दिली. पोलिसांनी तक्रारीची दखल घेत गावात येऊन चौकशी केली व सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यावेळी आरोपी संतोष थोरात याच्या सोबत पीडित मुलगी गेल्याचे निष्पन्न झाले. शिवाय आरोपीबरोबर मुलीला जाताना तिची मैत्रीण, आजी व नजीक असणाऱ्या दोन महिलांनी शेवटचे पाहिले होते हेही तपासात समोर आले. यानुसार आरोपीला पोलिसांनी अटक केली. ढेबेवाडी पोलिसांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या प्रकरणात सरकारी पक्षाच्या वतीने एकूण ३३ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये पीडित मुलगीची मैत्रीण, आजी, शेजारील दोन महिला, चॉकलेट दुकानदार, ग्रामसेवक यांच्या साक्षी तसेच सीसीटीव्ही फुटेज व शवविच्छेदन अहवाल महत्वपूर्ण ठरला. साक्षी, पुरावे व सरकार पक्षाने केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपी संतोष थोरात याला बलात्कार व खूनप्रकरणी दोषी धरून फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. यावेळी न्यायालयाने आरोपीस वरिष्ठ न्यायालयात अपील करण्यास मुदतही देण्यात आली आहे.

## राऊतवाडी धबधबा पर्यटकांसाठी बंद

**राधानगरी :** तालुक्यातील प्रसिद्ध असणारा राऊतवाडी धबधबा पावसाचा जोर वाढल्याने या धबधब्यास पावसा मुळे पाण्याचा फ्लो मोठ्या प्रमाणात असल्याने चुकून दगड पडण्याची शक्यता असल्याने अनुचित प्रकार घडू नये, याची दक्षता म्हणून राऊतवाडी धबधबा बंद करण्यात आला आहे. पर्यटकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन शरद गुरव यांनी केले आहे.

**अटलांटा लिमिटेड**

सीआयएन: एल६४२००एमएच१९८४पीएलसी०३१८५२

नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालय: ५०४, समर्पण कॉम्प्लेक्स, न्यु लिंक रोड, चकाला, मिराडोर हॉटेलजवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९९

फोन: ०२२-२८३२२७१५ ईमेल: cs@atlantainfra.com;

वेबसाईट: https://atlantalimited.in

**सभासदांना सूचना**

सूचना याद्वारे देण्यात येते की कंपनी अधिनियम, २०१३ (''अधिनियम'') च्या कलम ११० सहवाचता कलम १०८ आणि काही असल्यास इतर प्रयोज्य तरतुदी सहवाचता कंपनीज मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) रुल्स, २०१४ (''रुल्स'') च्या नियम २० आणि २२, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ (''सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स'') च्या रेग्युलेशन ४४ (वेळोवेळी प्रचलित त्यांच्या कोणत्याही सांविधिक सुधारणा किंवा पुर्नअधिनियमितीसह) ला अनुसरून, निगम व्यवहार मंत्रालयाद्वारे जारी सर्क्युलर क्र. ११/२०२२ दिनांक २८ डिसेंबर, २०२२, सहवाचता सर्क्युलर क्र. १४/२०२२ दिनांक २८ डिसेंबर, २०२२, सहवाचता सर्क्युलर क्र. १४/२०२० दिनांक ०८ एप्रिल, २०२०, १७/२०२० दिनांक १३ एप्रिल २०२०, २२/२०२० दिनांक १५ जून २०२०, ३३/२०२० दिनांक २८ सप्टेंबर, २०२०, ३९/२०२० दिनांक ३१ डिसेंबर, २०२०, १०/२०२१ दिनांक २३ जून २०२१, २०/२०२१ दिनांक ०८ डिसेंबर, २०२१ आणि ०३/२०२२ दिनांक ०५ मे, २०२२ (''एमसीए सर्क्युलर्स''), सेबी सर्क्युलर क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ दिनांक १२ मे, २०२२ ('सेबी सर्क्युलर') आणि सुधारणेनुसार इन्स्टिट्युट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया द्वारे जारी सेक्रेटरीयल स्टँडर्ड ऑन जनरल मिटिंग्जच्या अनुपालनात कंपनी फक्त इलेक्ट्रॉनिक माध्यमाने (ई-मतदान) दिनांक २१ जुलै, २०२३ रोजीच्या पोस्टल बॅलट सूचनेत नमूद विशेष ठरावाच्या मार्गाने विशेष कामकाजाकरीता सभासदांची मंजुरी मिळविण्यासाठी इच्छुक आहे.

एमसीए सर्क्युलर्स आणि सेबी सर्क्युलर्सच्या अनुपालनात पोस्टल बॅलट सूचना ही कट ऑफ तारीख म्हणजेच शुक्रवार, १४ जुलै, २०२१ रोजीस कंपनी किंवा कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट (आरटीए) किंवा त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटस्कडे ई-मेल पत्ते नोंदविलेल्या सभासदांना २१ जुलै, २०२३ रोजी इलेक्ट्रॉनिक माध्यमाने पाठविण्यात आली आहे.

पोस्टल बॅलट सूचनेची प्रत कंपनीची वेबसाईट https://atlantalimited.in, स्टॉक एक्सचेंजची वेबसाईट www.bseindia.com आणि www.nseindia.com आणि दूरस्थ ई-मतदान सुविधा पुरवणारी एजन्सी म्हणजेच सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडची वेबसाईट www.evotingindia.com वर सुध्दा उपलब्ध आहे. ज्या सभासदांना सूचना प्राप्त झालेली नाही ते वरील नमूद वेबसाईटवरून डाऊनलोड करू शकतात.

ई-मतदानाच्या कालावधी सोमवार २४ जुलै, २०२३ रोजी स. ९.०० वा. सुरू होईल आणि मंगळवार २२ जुलै, २०२३ रोजी सायं. ५.०० वा. संपेल. ई-मतदान मॉड्युल त्यानंतर एनएसडीएलद्वारे निष्क्रिय करण्यात येईल. मतदानासाठी पात्र सभासदांनी सहमती किंवा असहमतीचा पत्रव्यवहार हा फक्त इलेक्ट्रॉनिकली त्यांचे मतदान करून म्हणजेच दूरस्थ ई-मतदानाने काटेकारपणे घेण्यात येईल.

शुक्रवार, १४ जुलै २०२३ (कट ऑफ तारीख) रोजीस समभाग धारण केलेले सभासदच फक्त सूचनेत विनिर्दिष्ट ठरावाशी संबंधित दूरस्थ ई-मतदान प्रक्रियेमार्फत मतदान करण्यासाठी हक्कदार राहतील.

डिमटेरियलाईज्ड माध्यमाने समभाग धारण केलेल्या सभासदांना त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटस्कडे त्याचे केवायसी तपशिलासह इमेल पत्ते नोंदविण्याची/अद्ययावत करण्याची विनंती करण्यात येत आहे. प्रत्यक्ष माध्यमाने समभाग धारण केलेल्या सभासदांना कंपनीच्या आरटीएकडे प्रपत्र आयएसआर-१ रितसर भरून आणि सही करून सादर करून त्यांचे केवायसी तपशिलासह इमेल पत्ते नोंदविण्याची/अद्ययावत करण्याची विनंती करण्यात येत आहे.

ई-मतदानाचे निष्कर्ष ई-मतदान कालावधी पूर्ण झाल्यापासून २ कामकाजाच्या दिवसांत घोषित करण्यात येतील आणि परिनिरिक्षकांच्या अहवालासह कंपनीची वेबसाईट https://atlantalimited.in/ आणि स्टॉक एक्सचेंजची वेबसाईट www.bseindia.com आणि www.nseindia.com होस्ट करण्यात येतील.

तुम्हाला ई-मतदानाच्या संदर्भात कोणतीही चौकशी किंवा माहिती हवी असल्यास तुम्ही helpdesk.evoting@cdslindia.com कडे ईमेल पाठवू शकता किंवा टोल फ्री क्र. १८०० २२५३३ वर फोन करावा.

अटलांटा लिमिटेडकरिता
सही/-
प्रथमेश गावकर
कंपनी सेक्रेटरी आणि अनुपालन अधिकारी

मुंबई, २१ जुलै, २०२३

**कोटक महिन्द्र बँक लिमिटेड**

सीआयएन: L65110MH1985PLC038137

नोंदणीकृत कार्यालय: २७बीकेसी, सी२७, जी ब्लॉक, वांद्रा कुर्ला संकुल, वांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१. दूरध्वनी: +९१-२२-६१६६०००१ फॅक्स: +91 22 6713 2403 वेबसाईट: www.kotak.com इमेल: KotakBank.Secretarial@kotak.com

**३० जून २०२३ रोजी संपलेल्या तिमाहीचे वित्तिय निष्कर्ष**

₹ कोटीमध्ये

| तपशील | स्वतंत्र | | | एकत्रित | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३० जून २०२३ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) | ३१ मार्च २०२३ रोजी संपलेले वर्ष (लेखापरिक्षित) | ३० जून २०२२ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) | ३० जून २०२३ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) | ३१ मार्च २०२३ रोजी संपलेले वर्ष (लेखापरिक्षित) | ३० जून २०२२ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षित) |
| कामकाजापासून एकूण (निव्वळ) उत्पन्न | १३,१८३.२६ | ४१,३३३.९० | ८,४५४.५२ | २०,७२३.९१ | ६८,१४२.०३ | ११,५६९.०९ |
| करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (असाधारण बाबींपूर्वी) | ४,५८५.२६ | १४,३९०.९९ | २,७५९.६७ | ५,५८६.४३ | १९,६४६.१८ | ३,६८५.९० |
| करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (असाधारण बाबींनंतर) | ४,५८५.२६ | १४,३९०.९९ | २,७५९.६७ | ५,५८६.४३ | १९,६४६.१८ | ३,६८५.९० |
| करोपरान्त निव्वळ नफा/(तोटा) (असाधारण बाबींपूर्वी) | ३,४५२.३० | १०,९३९.३० | २,०७१.१५ | ४,१५०.१९ | १४,९२५.०१ | २,७५५.३९ |
| करोपरान्त निव्वळ नफा/(तोटा) (असाधारण बाबींनंतर) | ३,४५२.३० | १०,९३९.३० | २,०७१.१५ | ४,१५०.१९ | १४,९२५.०१ | २,७५५.३९ |
| भरणा झालेले समभाग भांडवल | ९९३.६१ | ९९३.२८ | ९९२.७२ | ९९३.६१ | ९९३.२८ | ९९२.७२ |
| राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव आणि अल्पधारकांचे हित वगळून) | ८१,९६६.६७** | ८१,९६६.६७** | ७०,९६४.१४* | ११०,७६०.८१** | ११०,७६०.८१** | ९५,६४१.७०* |
| मूलभूत मिळकत (रु. ५/- प्रत्येकीच्या) प्रतिसमभागास (असाधारण बाबींपूर्वी) (३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षा व्यतिरिक्त वार्षिकीकृत न केलेले) | १७.३८ | ५४.८९ | १०.४३ | २०.८९ | ७४.९६ | १३.८८ |
| सौम्यीकृत मिळकत (रु. ५/- प्रत्येकीच्या) प्रतिसमभागास (वार्षिकीकृत न केलेले) (असाधारण बाबींपूर्वी) | १७.३८ | ५४.८७ | १०.४३ | २०.८९ | ७४.९४ | १३.८८ |
| सदर कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न [कालावधीसाठी (करोपरांत) नफा/(तोटा) यांच्यासह आणि (करोपरांत) इतर सर्व समावेशक उत्पन्नासह] | - | - | - | | | |
| सिक्युरीटीज प्रिमियम अकाउंट | २५,०८३.२४ | २४,९८३.९३ | २४,८०७.९२ | | | |
| नेटवर्थ (नोंद क्र. 3 पहा) | ८६,४३४.९३ | ८२,७९४.८१ | ७४,०५८.५० | | | |
| कर्जाची थकबाकी | २०,३७८.१६ | २३,४१६.२७ | १५,३८९.९० | | | |
| शिल्लक परिवर्तनीय प्राधान्यतः समभाग | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | | | |
| ऋण - समभाग गुणोत्तर (नोंद क्र. 3 पहा) | ०.२३ | ०.२८ | ०.२१ | | | |

* ३१ मार्च २०२२ नुसार

** ३१ मार्च २०२३ नुसार

नोंदी:

१. वर दिलेली माहिती ही सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोझर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन्स ३३ व ५२ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसकडे सादर करण्यात आलेल्या त्रैमासिक वित्तिय निष्कर्षांच्या सविस्तर नमुन्याचा सारांश आहे. वर सांगितलेल्या त्रैमासिक वित्तिय निष्कर्षांचा संपूर्ण नमुना स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाइट्स www.bseindia.com आणि www.nseindia.com तसेच, बँकेच्या वेबसाइट https://www.kotak.com/en/investor-relations/financial-results.html?source=website वर देखिल उपलब्ध आहे.

२. भारतीय लेखाप्रमाणे (Ind AS) बँकिंग कंपन्यांना लागू होत नाहीत, म्हणून एकूण सर्वसमावेशक उत्पन्न आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न लागू होत नाहीत.

३. सेबी (लिस्टींग ऑब्लीगेशन्स ॲण्ड डिस्क्लोझर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ५२(४) अनुसार आवश्यक असणारी माहितीः

गुणोत्तरांचा हिशेब करण्याची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे आहेः

| | |
|---|---|
| ऋण - समभाग गुणोत्तर | कर्ज/भांडवलाची बेरीज आणि राखीव व अधिकचे उत्पन्न यांचे गुणोत्तर दर्शविते. |
| नेटवर्थ | आरबीआयने सादर केलेल्या मास्टर सुर्क्युलर - एक्स्पोजर नॉर्म्सनुसार |

४. कॅपिटल रिडम्शन रिझर्व्ह आणि डिबेंचर रिडम्शन रिझर्व्ह बँकिंग कंपन्यांना लागू होत नाही.

५. ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षात पालन करण्यात आलेल्या लेखा धोरणांमध्ये ३० जून २०२३ रोजी संपलेल्या तिमाहीत कोणतेही लक्षणीय/महत्वाचे बदल करण्यात आलेले नाहीत.

संचालक मंडळाच्या आज्ञेवरुन
कोटक महिन्द्र बँक लिमिटेड करीता

दिपक गुप्ता
संयुक्त व्यवस्थापकीय संचालक

मुंबई, जुलै २२, २०२३